# आरोग्य सेवा संचालनालय

## (महाराष्ट्र राज्य)

**"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१**

| | | |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | **दूरध्वनी**<br>२२६२१००६ | Website : https://arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email : cpsdhs@gmail.com   १३५४-१३८१ |
| **नोंदणी आदेश** | | क्र.आसेसं/डीएचएस सीपीएस पदविका २०१७/न.क्र.४१ /१७<br>दिनांक २९ -डिसेंबर, २०१७ |


**विषय:-** <u>डीएचएस सीपीएस -२०१७</u>
**महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांना सेवांतर्गत सीपीएस पदविका अभ्यासक्रम सत्र - २०१७ करिता नोंदणी देणेबाबत**

**संदर्भ:-** १) दि. २९/०६/२०१७ आयोजित डीएचएस सीपीएस (२०१७) समुपदेशन सत्र.
२) मा. उच्च न्यायालय, मुंबई व औरंगाबाद यांचे अनुक्रमे दि.०६/१०/२०१७ व दि.१३/१०/२०१७ रोजीचे आदेश.
३) शासनाचे क्र. न्यायिक २०१७/प्र.क्र.३९४/सेवा-३ दि. १६/१२/२०१७ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, डीएचएस सीपीएस वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम २०१७ च्या प्रवेशप्रक्रियेसाठी नीट पीजी २०१७ मधील पात्र उमेदवारांमधून दि. २९/०६/२०१७ रोजीच्या समुपदेशन सत्राव्दारे निवड करण्यात आलेली होती. निवड करण्यात आलेल्या २३ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी ११ शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियमित सेवा ३ वर्षापेक्षा कमी असल्याने व तद्नंतर मा. उच्च न्यायालयामध्ये सदर प्रकरणी याचिका दाखल असल्याने प्रतिनियुक्ती आदेश देण्यात आलेले नव्हते. तथापि संदर्भ क्र. २ नुसार, मा. उच्च न्यायालय, मुंबई व औरंगाबाद यांनी सदर उमेदवारांना सेवांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कोटयामधून प्रवेश देण्याबाबत आदेशित केलेले आहे व त्याच अनुषंगाने शासनाने संदर्भ क्र. ३ नुसार सदर उमेदवारांना मा. उच्च न्यायालय, मुंबई व औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशाच्या अधिन राहून कार्यवाही करण्याबाबत कळविलेले आहे.

संचालनालयाने सदर उमेदवारांना नियमानुसार अनुज्ञेय असलेले दुर्गम/अतिदुर्गम/आदिवासी/नक्षलग्रस्त भागातील सेवेबाबतचे गुणाधिक्य देऊन अंतिम गुणवत्तायादी तयार केली होती. सोबत जोडलेल्या प्रपत्रांमध्ये डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरीता निवड झालेल्या वैदयकीय अधिका-यांची विषयनिहाय व रुग्णालयनिहाय यादी सोबत जोडली आहे.

१) डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या सेवांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आल्यानंतरव डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते शासनाची किमान २ वर्षे सेवा करतील असे बंधपत्र (हमीपत्र) अभ्यासक्रमासाठी रुजू होण्यापूर्वी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे विहीत मार्गाने भरुन देणे बंधनकारक राहील. जर बंधपत्रातील अटी न पाळल्यास नोंदणीधारकांना रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त)एवढी बंधपत्राची रक्कम संचालक,आरोग्य सेवा,मुंबई यांच्याकडेजमा करतील असे बंधपत्र अभ्यासाकरिता कार्यमुक्त करण्यापुर्वी संबधीत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हाशल्यचिकित्सक,प्राचार्य/प्रपाठक यांनी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर संबंधित वैदयकिय अधिकारीयांच्याकडून भरुन घेणे आवश्यक राहील.सदरहु बंधपत्राची मुळप्रत व त्याबाबत संबंधित वैदयकिय अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेऊन त्याची प्रत प्राप्त झाल्याशिवाय त्यांना कार्यमुक्त करण्यात येऊ नये व १५ दिवसांच्या आत सदरहू बंधपत्राची मुळप्रत व सेवापुस्तकातील नोंदीची प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक,प्राचार्य/ प्रपाठक यांनी या संचालनालयास सादर करावी.

२) डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सेवा जेवढया कालावधीनंतर सोडणार त्याप्रमाणात बंधपत्राची रक्कम वसूल करण्यात येईल. या संबंधी शासनाचा निर्णय संबंधित वैद्यकीय अधिका-यांवर बंधनकारक राहील.

३) डीएचएस सीपीएस पदविका नोंदणी देऊन प्रतिनियुक्ती दिलेल्या वैद्यकीय अधिका-याने अभ्यासक्रमाकरिता रुजू होऊन अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास /अभ्यासक्रम मध्येच सोडून दिल्यास प्रतिनियुक्ती कालावधीत त्यांना देण्यात आलेले वेतन व भत्ते त्यांच्याकडून वसूल करण्यात येतील. तसेच परत नोंदणीसाठी विचार केला जाणार नाही.

४) डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांची माहिती आरोग्य सेवा संचालनालयाकडून दिली जाईल. त्याचप्रमाणे डिएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रतिनियुक्ती आदेश प्राप्त होताच संबंधित अधिका-यांने त्यांना नोंदणी दिलेल्या रुग्णालयात दिलेल्या विषयांत नोंदणी प्राप्त करुन घेण्याकरिता जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांच्याकडे अर्ज करुन ती त्वरीत घेणे आवश्यक राहील.

५) डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता नोंदणी देण्यात आलेल्या उमेदवारांचे अभ्यासक्रम वर्ष पूर्ण होऊन अंतिम परिक्षेला बसलेल्या उमेदवारांना परिक्षा संपताच प्रतिनियुक्ती दिलेल्या रुग्णालयातून कार्यमुक्त करण्यात येईल. प्रथम प्रयत्नाकरिता परिक्षेला बसले नाहीत अथवा उत्तीर्ण झाले नाहीत किंवा त्यांच्या जागी दुस-या वैद्यकीय अधिका-याला प्रतिनियुक्ती मिळालीनाही म्हणून उमेदवारांची बदली स्थगित करता येणार नाही किंवा कार्यमुक्त करण्याचे पुढे ढकलता येणार नाही.

६) सेवांतर्गत डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना या आदेशान्वये संचालनालय स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे. **सेवांतर्गत वैदयकीय अधिका-यांनी प्रथम संबंधित रुग्णालयात दि.२६/१२/२०१७ किंवा त्यापुर्वी रुजू व्हावे व त्यानंतर मुळ पदावरुन कार्यमुक्त व्हावे.** उमेदवाराने नोंदणी न घेतल्यास ती नोंदणी आपोआप रद्द होईल व उमेदवाराकडून प्रचलित नियमांनुसार दंडआकारण्यात येईल. तसेच संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीमध्ये त्यांची आस्थापना संचालनालय स्तरावरुन हाताळली जाणार आहे.

७) अभ्यासक्रमाच्या कालावधीत शक्य तो रजेवर जाऊ नये तसेच रजेची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे रजा घेतल्यास त्याची माहिती संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांच्यामार्फत संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना कळवावी. या रजेसंबंधीचे नियम हे सीपीएस परेल, मुंबई कार्यालयाच्या पदविका अभ्यासक्रमाच्या उपस्थितीच्या नियमानुसार राहील.

८) डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना निवासाची सोय उपलब्धतेनुसार जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांच्याकडूनकेली जाईल. अभ्यासक्रमाचा अवधी पूर्ण होताच निवासस्थान रिक्त करावे लागेल.

९) उमेदवारांना अन्य कोणत्याही ठिकाणी त्यांचे ताब्यात कुटुंब निवासस्थान (फॅमिली निवासस्थान) नसल्यास अभ्यासक्रमाच्या ठिकाणी फॅमिली निवासस्थान उपलब्धतेनुसार देण्याचा विचार करण्यात येईल. मात्र फॅमिली निवासस्थान उपलब्ध करुन देण्याचे बंधन राहणार नाही.

१०) प्रतिनियुक्तीचा कालावधी ही तात्पुरती बदली समजण्यात येऊन मुंबई नागरी सेवा नियम ३३९ व ३४४ मध्ये विहित केल्याप्रमाणे तसेच मुंबई नागरी सेवा नियम खंड (२) मधील परिशिष्ठ १५ मध्ये विहित करण्यात आलेल्या सर्वसाधारण नियमाच्या अधिन राहून घरभाडे भत्ता देय राहील.

११) डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर असलेल्या वैद्यकीय अधिका-यांचे वेतन व भत्ते संचालक, आरोग्य सेवा, मुंबई येथून काढण्यात येतील.

१२) शासन निर्णय क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.६२६/११/सेवा-३/मंत्रालय, मुंबई दि.०७/०८/२०१२ अन्वये ज्या सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांना उच्च शिक्षणासाठी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल अशा वैद्यकीय अधिका-यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेयअसणार नाही.

१३) सेवांतर्गत वैदयकीय अधिका-यांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते संचालक, आरोग्य सेवा, मुंबई येथे हजर होतील व त्यांनी आपला रुजू अहवाल संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे सादर करावेत व पुढील पदस्थापनेकरीता त्यांनी त्यांचा विकल्प संचालनालयास सादर करावा.

डीएचएस सीपीएस पदविका अभ्यासक्रम सुरळीत व सुकर पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित वैद्यकीय अधिका-यांना पूर्ण वेळ विषयाच्या विभागात काम करणे आवश्यक असल्यामुळे त्यांना प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात येत आहे.

संचालक, आरोग्य सेवा,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (संबंधित जिल्हा परिषद)
२) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे (सर्व)
३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (संबंधित जिल्हा)
४) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (संबंधित जिल्हा)
५) वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय (संबंधित जिल्हा)

६) जिल्हा कोषागार अधिकारी, (संबंधित जिल्हा).
७) महालेखाकार महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर.
८) अध्यक्ष, कॉलेज ऑफ फिजीशियन अॅन्ड सर्जन्स, परेल, मुंबई.

प्रत सविनय सादर :-

१) मा.प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग (सेवा-३) मंत्रालय, मुंबई.
२) मा. आयुक्त आरोग्य सेवा व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

# List of in-service candidates selected for DHS CPS Courses 2017

**Date - 21/12/2017**

| Sr. No | SML No. | Subject | Name of Institution | Candidate Name | Main Category | Selected Category | Selection Quota | In-Service Medical Officer/ Private Candidates |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 | DCH | District Hospital For Women Amravati (Dafrin) | Sayed Arshad Miyan | Open | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 2 | 10 | DGO | District Hospital For Women Amravati (Dafrin) | Fafat Shriram Omprakash | Open | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 3 | 13 | DGO | District Hospital For Women Amravati (Dafrin) | Shattari Tahaniyat Banu Abdul Hafij | Open | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 4 | 14 | DCH | District Hospital For Women Amravati (Dafrin) | Shaikh Tauqeer Ahmed Shaikh Jilani | Open | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 5 | 17 | DOMS | Daga Memorial Govt. Women Hospital, Nagpur | Deotale Bhanupriya Bandu | SC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 6 | 19 | DCH | Civil Hospital, Nashik | Khairnar Sujit Shivaji | OBC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 7 | 21 | DCH | District Hospital Bhandara | Meshram Archana Avinash | SC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 8 | 22 | DGO | Civil Hospital, Osmanabad | Mane Swapnali Sureshrao | OBC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 9 | 23 | DGO | District Hospital, Beed | Morale Deepashri Diliprao | NT-3(D) | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 10 | 28 | DCH | District Hospital, Aundh Camp, Pune | Patil Manoj Pundlik | OBC | Open | In-Service | In-Service Medical Officer |
| 11 | 29 | DGO | Civil Hospital, Ahmednagar | Tuwar Prashant Nanasaheb | OBC | Open | In-Service | In-Service Medical Officer |